# कृत्रिम रेतनाचे फायदे

**डॉ. महेशकुमार इंगवले**

पशुजनन, मादीरोग व प्रसुतीशास्त्र विभाग
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशु विज्ञान संस्था, अकोला.

माजाचे योग्यवेळी निदान व वेळेवर कृत्रिम रेतन हे गर्भधारणेसाठी महत्वाचे असते. कृत्रीम रेतनाचे फायदे खालील प्रमाणे आहेत.



**कृत्रीम रेतनासाठी लागणारे साहित्य**

### १) जातीवंत सिध्द वळूचा वापर

कृत्रिम रेतनामध्ये चांगले अनुवांशिक गुण तसेच उच्च वंशावळीच्या वळूचे वीर्य वापरले जाते. त्यामुळे पुढची पिढी चांगल्या प्रतीची व जास्त दुग्ध उत्पादन देणारी मिळते.

### २) कमी गाई असलेल्या पशुपालकांना फायदा

एक ते तीन गायी असलेल्या पशुपालकांना कृत्रिम रेतनाचा फायदा होतो यामूळे वळू संभाळण्याची आवश्यकता नाही. अशा पशुपालकांनी आपली गाय कृत्रिम रेतनाने भरवून घ्यावी जेणेकरुन वळूवरच्या चाऱ्याचा व देखभालीचा खर्च वाचतो.

### ३) जननेंद्रियांच्या ससंर्गजन्य रोंगावर नियत्रंण

कृत्रिम रेतनामध्ये वापरलेले विर्य हे जातीवंत वळूचे असते तसेच वळूच्या सर्व तपासण्या करुन, त्यांचे विर्य रेतनास पाठविले जाते त्यामुळे संसर्गजन्य रोगावर नियत्रंण होते. आपल्याकडे गावामध्ये एकच वळू असतो व तो वळू सर्व गायीसाठी वापरला जातो. अशा वळूकडून संसर्गजन्य रोगाची लागण होण्याची शक्यता असते.



**गाईमध्ये कृत्रीम रेतन**

### ४) प्रजनन संस्थेमधील रोगांचे निदान व उपचार

कृत्रिम रेतन करण्यापुर्वी गायीची गर्भ पिशवी, बिजांड, कमळ मुख यांची तपासणी केली जाते. तपासणी मुळे प्रजनन संस्थेच्या अवयवाची स्थिती व त्यातील बदल समजू शकतात. निदान झालेल्या प्रजनन रोगावर योग्य प्रकारे उपचार केल्यामुळे गर्भधारणेचे प्रमाण वाढते.

### ५) आंतर पैदासाचे दुष्परिणाम टळतात

कृत्रिम रेतनामध्ये अनेक वळूचे वीर्य वापरले जाते यामुळे एकाच वळूचा वापर टाळला जातो त्यामुळे आंतर पैदास न होता चांगली पिढी तयार होते.

### कृत्रिम रेतनाची वेळ

कृत्रिम रेतन हे माजाचे निदान करुन करावे. गायीने संध्याकाळी माज दाखवल्यास सकाळी कृत्रिम रेतन करावे. म्हणजे गायीचा माज सुरु झाल्यानंतर सर्वसाधरणपणे १२–१८ तासांच्या दरम्यान कृत्रिम रेतन करावे. कृत्रिम रेतना नंतर गाईने तीन आठवडयांनी पुन्हा माज न दाखविल्यास गर्भधारणाची शक्यता असते. कृत्रिम रेतनानंतर अडीच ते तीन महिन्यानंतर पशुवैद्यकाकडुन गाईची गर्भतपासणी करावी.